**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०२ / २०१३.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०३ / ०७ /२०१३.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०२ , गुरुवार दिनांक ११ / ०७ /२०१३.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक ११ / ०७ / २०१३ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक ०२ गुरुवार दिनांक ११ / ०७ / २०१३ रोजी दुपारी १.०० वाजता होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| १४ | दुखवटयाचा प्रस्ताव |
| १५ | मे.प्रसन्ना पर्पल मोबिलिटी सोल्यू.प्रा.लि. चे व्यवस्थापक श्री.दिपक मगर यांनी दिनांक २७/५/२०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवा दि.१ जून २०१३ पासून बंद करणे बाबतचा ऑफीस रिपोर्ट. याबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.१२१ दि.२१/०६/२०१३ अन्वये प्रस्तावातील धोरणात्मक बार्बीवर निर्णय घेणेकामी प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर. |
| १६ | मा.केंद्रशासीत UIDSSMT योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेच्या १) सावेडी भुयारी गटार योजना व २) केडगांव/ सारसनगर भुयारी गटार योजना या योजनांचा एकत्रित प्रकल्प अहवालास मा.महासभेची मान्यता मिळणे बाबत |
| १७ | UIDSSMT योजने अंतर्गत (१) अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज - २. (२) केडगाव पाणी पुरवठा योजना या योजनांअंतर्गत पाणी वितरण व्यवस्था तसेच वितरण व्यवस्थे अंतर्गत HDPE पाईप्स वापरणेस व त्या अनुषंगाने खर्चास मा.महासभेची मंजुरी मिळणे बाबत |
| १८ | अहमदनगर शहर वाहतूक आराखडा तयार करणेस मा.महासभेची मंजूरी मिळणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| १९ | सिक्युरिटी डिपॉझिट रिफंड मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.<br>१) मे.जगदंबा इले.मजुर सह संस्था मर्या, अहमदनगर यांचा दि.०४/०९/२०१२ रोजीचा अर्ज.<br>२) मा.आयुक्त यांची दिनांक ०८/०२/२०१३ रोजीची मंजुरी. |
| २० | भिंगार सर्व्हे नं.३४३/२अ/२ब, ३४३/२अ२, ३४३ २अ-१,३४३/१ब मधील मोकळी जागा एकता एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी या संस्थेस प्ले ग्रुप व क्रीडांगणासाठी देणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २१ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर साो, यांचे मान्यतेने.
दिनांक : ०३ / ०७ /२०१३.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १४** **दिनांक : ११ /०७ /२०१३**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** दुखवट्याचा प्रस्ताव.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | उत्तराखंड येथील नैसर्गिक आपत्तीमध्ये मरण पावलेले भाविक तसेच बचाव कार्य करणारे वीरगती प्राप्त झालेले लष्करी जवान यांच्या झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | मा.केंद्रीय मंत्री व कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते विद्याचरण शुक्ल यांचे मंगळवार दिनांक ११/०६/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | पुणे येथील ज्येष्ठ इतिहास संशोधन व भारतातील पहिल्या महिला नानकशास्त्रज्ञ डॉ.शोभना गोखले यांचे शनिवार दि. २२/०६/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | शेतकरी कामगार पक्षाचे नंते मा.खा.दिनकर बाळासाहेब पाटील यांचे सोमवार दिनांक २४/०६/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ५ | अहमदनगर शहरातील सामाजिक कार्यकर्ते सौ.राधिका नंदलाल जोशी यांचे सोमवार दिनांक २४/०६/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | अहमदनगर शहरातील सामाजिक कार्यकर्ते सौ.पुष्पलता चंगेडिया यांचे गुरुवार दिनांक २६/०६/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ७ | नगर शहरातील सेवानिवृत्त वनक्षेत्र अधिकारी निवृत्तीराव हिरे यांचे शुक्रवार दिनांक २८/०६/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | अहमदनगर महानगरपालिकेचे सेवानिवृत्त कर्मचारी नंदकुमार बनसोड यांचे सोमवार दिनांक ०१/०७/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ९ | मराठी चित्रपट सृष्टीतील प्रसिध्द अभिनेते श्री. सतीष तारे यांचे बुधवार दिनांक ०३/०७/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १० | अहमदनगर शहरातील सामाजिक कार्यकर्ते सतिष तुळशीराम सिध्दम यांचे बुधवार दिनांक ०३/०७/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ११ | दहिगांवने ता.शेवगांव येथील रहिवाशी श्रीमती पार्वतीबाई लक्ष्मणराव पाउलबुधे यांचे रविवार दिनांक ०७/०७/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १२ | सराफ सुवर्णकार संघाचे उपाध्यक्ष राजुशेठ वालकर यांचे रविवार दिनांक ०७/०७/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १३ | अहमदनगर शहरातील सामाजिक कार्यकर्ते गोविंद अनारसे यांचे सोमवार दिनांक ०८/०७/२०१३ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

**ठराव :-** दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १५** **दिनांक : ११ / ०७ /२०१३.**

---

**प्रस्तावाचा विषय :** मे.प्रसन्ना पर्पल मोबिलिटी सोल्यू.प्रा.लि. चे व्यवस्थापक श्री.दिपक मगर यांनी दिनांक २७/५/२०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवा दि.१ जून २०१३ पासून बंद करणे बाबतचा ऑफीस रिपोर्ट. याबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.१२१ दि.२१/०६/२०१३ अन्वये प्रस्तावातील धोरणात्मक बाबींवर निर्णय घेणेकामी प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ-** १. प्रसन्ना पर्पल मो.सो.लि. चे पत्र जा.क्र.१३, दि. २७/०५/२०१३.
२. नोटीस क्र.०२, ११/०१/२०१३ व नोटीस क्र. ०६, दि. ०८/०२/२०१३.
३. मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०६/२०१३.
४. प्रसन्ना पर्पल मो.सो.लि. चे पत्र जा.क्र.१४, ०१/०६/२०१३.

दि.३०/०५/२०१३रोजी महानगरपालिकेचे मा.महापौर यांचे दालनात झालेल्या बैठकीनुसार अभिकर्ता संस्थेने संदर्भिय क्र. ४ चे पत्र दिले असून सदर पत्र मा.स्थायी समिती दि.०१/०६/२०१३ चे निदर्शनास आणून देण्यात आले असून मा.स्थायी समिती निर्देशानुसार पत्रावर सविस्तर अहवाल पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**१.** अभिकर्ता संस्थेने उपरोक्त संदर्भ क्र.१ चे पत्राव्दारे अभिकर्ता संस्थेला शहर बससेवा सुरू केल्यापासुन आजपावेतो सुमारे १.२५ कोटी रूपयांपेक्षा अधिक संचित तोटा झाला असल्याने नाईलाजास्तव शनिवार दि.०१ जून २०१३पासून सदर सेवा बंद करण्यांत येत आहे, असे कळविले आहे.

- शहर बससेवेस इंधन दरवाढ स्पेअर पार्ट, टायर्स इ. किंमतीच्या दरवाढ अवैध प्रवासी वाहतूकीमुळे तोटा झाल्याचे नमूद करण्यांत आलेले आहे. यापूर्वी इंधन दरवाढी नुसार तसेच नियमाप्रमाणे मा. स्थयी समितीच्या मंजूरी नुसार तिकीट दरवाढ देण्यांत आलेली आहे. वाहनतळ, वर्क शॅापकरीता जागा दाखविण्यांत आलेल्या आहेत. मा.पालकमंत्री व महा.राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष यांचेशी झालेल्या चर्चेनुसार जुन्या स्टॅण्डमागील जागा मिळणेबाबत प्रयत्न चालू आहेत. अवैध प्रवासी वाहतूकी बाबत मा. महापौर व पदाधिकारी यांचे शिष्टमंडळ मा. जिल्हाधिकारी यांना भेटणार असल्याचे बैठकीत नमूद केले आहे. तसेच दि. ०१/०६/२०१३ चे स्थायी समितीमध्ये देखील बससेवेस संपूर्ण सहकार्य करणे बाबत सूचीत केल्याने बससेवा सुरू ठेवण्यात आलेली आहे.

**२.** अभिकर्ता संस्थेचे दि. २७/०५/२०१३ चे पत्राचे अनुषंगाने आपण आपले संदर्भीय पत्राव्दारे शहर बससेवा उपक्रम कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये, असे कळविले आहे. तसेच आपण अभिकर्ता संस्थेला चर्चेकरीता पाचारण केले.

अभिकर्ता संस्थेचे दि.२७/०५/२०१३ चे पत्रास महानगरपालिकेकडून पा.पु.जा.क्र.२३६ दि. २८/०५/२०१३अन्वये पत्र देवून मागील नोटीशीचा आधार घेवून दि.०१/०६/२०१३ पासून शहर बस वाहतूक बंद करण्यात येईल असे संयुक्तीक व कायदेशीर नाही. सदर उपक्रम चालू करताना संस्थेशी करारनामा झालेला आहे. त्यानुसार अभिकर्ता संस्था व महानगरपालिका सदरचा उपक्रम पुढील १० वर्षापर्यंत राबविणेस बांधील आहे. करिता शहर बस वाहतूक कोणत्याही परिस्थिती बंद करू नये असे कळविलेले होते.

**३**. दि. ३०/०५/२०१३ रोजी मा. महापौर महोदया, म.न.पा. अहमदनगर यांचे दालनात आपल्या तसेच प्रमुख पदाधिकारी यांचे उपस्थितीत आपण घडवून आणलेल्या चर्चेत अभिकर्ता संस्थेच्या अडचणी, जागेचा प्रश्न अहमदनगर शहरात अनधिकृत रिक्षांचे संख्येत झालेली बेसुमार वाढ, डिझेलचे वाढणारे दर, खालावलेली शहर बसची प्रवासी संख्या हया सर्व विषयांवर सांगोपांग चर्चा झाली असून प्रस्तूत चर्चेमध्ये अत्यंत सकारात्मक भूमिका घेवून मनपा पदाधिका-यांनी शहर बससेवा सुरू ठेवण्याकरीता अभिकर्ता संस्थेला आर्थिक मदत देण्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे आश्वासन दिले, त्याबद्दल आपले मनपूर्वक धन्यवाद.

- दि. ३०/०५/२०१३ रोजी मा.महापौर, मा.आयुक्त, मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा.उपायुक्त व अभिकर्ता संस्थेचे श्री. परदेशी, मगर यांचे उपस्थितीत मिटींगमध्ये बससेवे बाबत सखोल चर्चा झाली असून अभिकर्ता संस्थेचे बससेवेचे नियोजनाबाबत तसेच बससेवेस कशा पध्दतीने मदत करता येईल याबाबत चर्चा झाली असून अभिकर्ता संस्थेस याबाबत सविस्तर पत्रव्यवहार करणेस सांगण्यांत आले आहे.

**४**. प्रस्तूत परिस्थितीत झालेला प्रचंड तोटा पाहता अभिकर्ता संस्था शहर बस वाहतूक सुरू ठेवून तोटयामध्ये वाढ करू इच्छित नाही. तसेच अभिकर्ता संस्थेला कामगार वेतनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अभिकर्ता संस्थेला इंधन, सुटेभाग, टायर इत्यादी पुरविणा-या पुरवठादाराची थकबाकी साचली आहे व अशा परिस्थितीत मनपा पदाधिका-यांनी अभिकर्ता संस्थेला आर्थिक मदत देवून विना तोटा सेवा सुरू ठेवण्यास सकारात्मक भूमिका घेतली असल्याने त्या अनुषंगाने खालील बाबी मांडण्यात येत आहेत.

**४.१** शहर बससेवेचा सर्वाधिक खर्च इंधनावर होतो. शहर बससेवा फेब्रूवारी २०११ मध्ये सुरू करण्यात आली तेव्हा डिझेलचा दर प्रति लिटर रू. ४१.५२ इतका होता व सध्याचा दर रूपये ५६.४० इतका झाला आहे. म्हणजे डिझेलच्या दरामध्ये रू. १४.८८ प्रति लिटर वाढ झाली आहे.

डिझेल खर्चाची माहे नोव्हेंबर २०१२ पासूनची आकडेवारी खालील प्रमाणे आहे. [आकडे लाखात]

| अ.नं. | महिना | लिटर [खप] | खर्च | प्रतिलिटर १४.८८प्रमाणे होणारी वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | नोव्हेंबर २०१२ | ०.२५ | १३.०४ | ३.७४ |
| २ | डिसेंबर २०१२ | ०.३१ | १६.१२ | ४.६२ |
| ३ | जानेवारी २०१३ | ०.३४ | १७.८२ | ५.०१ |
| ४ | फेब्रूवारी २०१३ | ०.२८ | १५.०१ | ४.१९ |
| ५ | मार्च २०१३ | ०.२९ | १५.४५ | ४.२६ |
| ६ | एप्रिल २०१३ | ०.२७ | १४.६७ | ४.०३ |
| ७ | मे २०१३ | ०.२८ | १५.२९ | ४.१२ |

**४.२**. डिझेल दरवाढीमुळे खर्चात होणारी वाढ भरून काढणे करीता शहर बस दरभाडे हा पर्याय आतापर्यंत वापरात येत होता. परंतू सुमारे ४००० इतक्या संख्येने असलेले अनधिकृत रिक्षा चालक शहर बसपेक्षा कमी दरात जास्त संख्येने प्रवासी उचलतात. त्यामुळे शहर बसची प्रवासी संख्या अधिकच घटते. असा प्रत्यक्षात अनुभव आल्याने वाढलेले दर अभिकर्ता संस्थेने कमी करून प्रवासी संख्या कमी न होण्याकरीता प्रयत्न केले आहेत. अशा परिस्थितीत दरमहा डिझेल खर्चातील १० टक्के वाटा मनपाने

उचलल्यास दरमहा १.२५ ते १.५० लाख रूपयां पर्यत अभिकर्ता संस्थेचा डिझेल वर खर्च कमी होउ शकेल व ही बाब अभिकर्ता संस्थेचा इतका तोटा कमी करू शकते.

- मनपाने बससेवेला आर्थिक मदत करावी असे नमूद केले आहे. इंधन दरवाढीबाबत १०% वाटा मनपाने उचलावा असे अभिकर्त्यांचे म्हणणे आहे. सदरचे अभिकर्त्यांचे म्हणणे संयुक्तीक वाटत नाही. इंधन दरवाढीनंतर एसटी महामंडळ तिकीट दरवाढ करते. त्याप्रमाणे अभिकर्ता संस्थेला तिकीट दरवाढ नियमानुसार करता येईल. तसेच तोटयात असणारे मार्ग, फे-या इत्यादी बाबत अभिकर्त्यांने नियोजन करणे आवश्यक आहे.

**५. जागेचे भाडे-** अभिकर्ता संस्थेस महानगरपालिकेकडून वाहनतळ, वर्कशॉप, ऑफीस करीता जागा न मिळाल्यामुळे अभिकर्ता संस्थेने ओम गार्डन, येथील खाजगी जागा दरमहा रूपये ६०,०००/- भाडे तत्वावर घेतली असून त्याकरीता आजपर्यत भाडयापोटी अभिकर्ता संस्थेस १३.८० लाख रूपये अदा करावे लागले आहेत. दि. ३०/०५/२०१३ चे वरील बैठकीत मनपा पदाधिका-यांनी सदर भाडे मनपा कडून देण्याचे मान्य केले `आहे. सुरवातीपासून अभिकर्ता संस्थेने सदर भाडेची मागणी केलेली असूनही आजपर्यत मनपाकडून सदर जागेचे भाडे मिळालेले नाही. या बार्बीवर सदर बैठकीत मनपा पदाधिकारी एकमत झाले असून या अनुषंगाने अभिकर्ता संस्था विनंती करते की, अभिकर्ता संस्थेची साचलेली वरील भाडे रकमेची थकबाकी एक रकमी स्वरूपात मिळाल्यास सध्याचे अवघड परिस्थितीत अभिकर्ता संस्था हया निधीचा उपयोग देणेकरांचे देणे चुकविण्या करीता करू शकेल. त्यामुळे शहर बससेवा चालू ठेवण्याकरीता साहित्य पुरवठा करण्याचा व्यापारी संस्था शहर बसला पूर्ववत साहित्य पुरवठा करू शकतील.

- महानगरपालिका जुन्या स्टॅण्डमागील जागा उपलब्ध करून देणेबाबत प्रयत्नशील आहे. त्याचप्रमाणे इतरही जागा दाखविण्यात अल्या आहेत. अभिकर्ता संस्थेचे मागणी प्रमाणे व करारापमाणे जागा मनपाने उपलब्ध करणे असल्याने दरमहा रूपये ६०,०००/- जागा भाडे तूर्तास देणे योग्य आहे. तसेच मागील भाडया बाबत अभिकर्ता संस्थेचा झालेल्या तोटयाबाबत यापूर्वीच प्रस्ताव तयार केला असून सदर प्रस्ताव मा.मुख्यलेखापरिक्षक यांचेकडेस प्रलंबीत आहे. सदर बाब धोरणात्मक स्वरूपाची असल्याने त्यावर मा.स्थायी समितीत चर्चा व निर्णय होणे संयुक्तीक राहिल.

**६. प्रवासी कर व बालपोषण अधिभार-** अभिकर्ता संस्थेला प्रवासी उत्पन्नाचे ३.५% प्रवासी कर व विक्री झालेल्या प्रत्येक तिकीटावर १५ पैसे दराने बालपोषण अभिभार शासनास दरमहा अदा करावा लागतो. अभिकर्ता संस्थेला पुरेसे उत्पन्न मिळा वा ना मिळो तिकीट रकमेचे ३.५% इतकी रक्कम प्रवासी कर म्हणून भरावी लागते. अभिकर्ता संस्थेला शहर बस वाहतूक चालविण्यात होत असलेल्या तोटयामुळे दि. ०१/०५/२०१२ पासून अभिकर्ता संस्थेवर प्रवासी कर व बालपोषण अधिभार थकीत आहे. म.न.पा.ने वरीष्ठ पातळीवरून शासन स्तरावर सदर करास करमाफी मिळवून दिल्यास किंवा सदर कराचे रक्कम इतके अनुदान दिल्यास अभिकर्ता संस्थेला दरमहा रू. १.५ लाख इतका निधी मिळू शकेल व तितका तोटा कमी होवू शकेल.

**-** बससेवेस प्रवासी कर व बाल कुपोषण कर शासनाने लावलेला आहे. शासनाकडून करमाफी मिळणेबाबत वरिष्ठ स्तरावरून प्रयत्न करावे लागतील. करिता कर माफी होणेकरिता मा.स्थायी समितीचा ठराव पारित होवून त्यानुसार मा.शासनास विनंती करण्यात येईल.

सदरची रक्कम मा.शासनास देय असल्याने या करिताची रक्कम थेट मा.उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे भरणे उचित राहिल.

**७. सवलती** - अभिकर्ता संथा अंध-अपंग व विदयार्थ्यांना प्रवास भाडे दरात २०% सवलत देते. स्मार्ट कार्ड व्दारा विदयार्थ्यांना अशी सवलत दिली जाते. ज्यांचा सुमारे १ लाख रूपयांइतका बोजा दरमहा अभिकर्ता संस्थेवर पडतो. सदर सवलत रकमेची प्रतिपूर्ती मनपाने केल्यास अभिकर्ता संस्थेचा दरमहा तितका तोटा कमी होणेस मदत होईल.

**-** करारनामा बाब क्र.६ अन्वये सवलतीचा दर ठरविणेचा अधिकार अभिकर्ता यांचा आहे. तसेच याबाबत परतावा मिळणेकामी महानगरपालिकेकडून प्रयत्न झाल्यास बससेवेस आर्थिक मदत मिळू शकेल.

**८. बॅक गॅरंटी-** मनपाकडे अभिकर्ता संस्थेने रू.१० लाख इतकी बॅक गॅरंटी रक्कम जमा केली आहे. सध्या अभिकर्ता संस्था प्रचंड तोटयात असून आपण आपल्या पत्रात शहर बससेवा उपक्रम कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये असे कळविले आहे. सध्याचे अवघड परिस्थितीत शहर बससेवा सुरू ठेवणे करीता संस्थेला पुरवठा करणा-या व्यापारी संस्थांचे देणे अदा करण्याकरीता मनपाने सदर बॅक गॅरंटीची रक्कम अभिकर्ता संस्थेला दिल्यास अभिकर्ता संस्था त्याव्दारे देणेदारांचे देणे देवू शकेल. परिणामी पुरवठादार पुनश्चः पुरवठा करू शकतील.

- अभिकर्त्याने करारनामा बाब क्र.५ अन्वये सुरक्षा रक्कम रू. १०.०० लाख महानगरपालिकेकडे दिलेली आहे व्यापा-यांची देणी देणेकामी बॅक गॅरंटीतून रक्कम देणेबाबत मागणी केली आहे. सदर मागणी अयोग्य असून नाकारणे योग्य.

**९. नफा-तोटा-** दरमहा येणारे प्रवासी उत्पन्न व होणारा खर्च यांचे विवरण अभिकर्ता संस्था आपणांस सादर करून विना तोटा सेवा देणे शक्य होणे करीता मनपाने तोटा भरपाई निधी [Loss Funding] उभारणी करण्याची अभिकर्ता संस्था विनंती करीत आहे. सर्व शासकीय यंत्रणांचे सहकार्य लाभल्यास व अनधिकृत ॲपे रिक्षा वाहतूकीवर प्रतिबंध आल्यास मनपाला असा निधी खर्च करण्याची आवश्यकता पडणार नाही. परंतू ज्या महिन्यात तोटा होईल त्या तोटा रकमेची प्रतिपूर्ती मनपाने करावी.अशी अभिकर्ता संस्था यापुढे तग धरू शकणार नाही व सदर सेवा निधी अभावी आपोआप बंद होईल. त्याकरीता अभिकर्ता संस्थेचा नाईलाज असेल याची कृपया नोंद घ्यावी. दिनांक ३०/०५/२०१३ चे बैठकीत आपण व मनपा पदाधिका-यांनी दि. ०१/०६/२०१३ पासून बससेवा बंद करू नये बाबत केलेल्या विनंती नुसार हया संस्थेने दिलेली सेवा बंदची नोटीस अबाधीत ठेवून सदर सेवा तुर्तास सुरू ठेवण्यांत येत आहे.

-महानगरपालिकेने तोटा भरपाई निधी उभारणी करावी व त्यातून भरपाई करणेबाबत अभिकर्त्याने विनंती केली आहे. सदरची मागणी अवास्तव आहे. तथापी जागा भाडे अवैध प्रवासी वाहतूक, बालकुपोषण व प्रवासी कराबाबत अनुदान मिळणे याबाबत मनपा संबधीत विभागाकडे पाठपुरावा करून प्रश्न सोडविता येवू शकतील तसेच अभिकर्त्याने देखील बससेवेचे व्यवस्थित नियोजन व्यवस्थित करणे क्रमप्राप्त आहे. बसेसच्या फे-या, न चालणारे मार्ग, अतिरिक्त कर्मचारी, वाहनांवर होणारा खर्च इत्यादी बाबत ताळमेळ ठेवल्यास तोटा कमी होवू शकतो.

दि. ०१/०६/२०१३ मधील स्थायी समितीच्या चर्चेनुसार तसेच प्राप्त पत्रानुसार बससेवेस येणा-या अडचणी [अवैध रिक्षा वाहतूक, जागेचा प्रश्न, आर्थिक मदत] इत्यादी बाबत योग्य निर्णय घेणेबाबत सदरचा प्रस्ताव व मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजूरी मिळावी, ही विनंती

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल लिपिक यांचा अहवाल असे.

यावर मॅके.इंजि.यांचा अभिप्राय की, अ.नगर शहर बसवाहतूक अभिकर्ता संस्थेने दि.१/६/२०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार सविस्तर अहवाल मा.स्थायी समितीच्या निर्णयार्थ ठेवणे उचित वाटते. मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, सविस्तर प्रस्तावानुसार सदरचा अहवाल निर्णयार्थ मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ ठेवणे उचित. सबब आदेशार्थ तथा निर्णयास्तव

यावर आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर .

मा.स्थायी समिती सभेमध्ये ठराव पारीत करण्यांत आला तो खालील प्रमाणे

--**--

**मा.स्थायी समिती ठराव :-** मे.प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु. प्रा.लि.चे व्यवस्थापक श्री. दिपक मगर यांनी दिनांक २७/५/२०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा दि. १ जून २०१३ पासून बंद करणे बाबतचा ऑफिस रिपोर्टावर मा.स्थायी समिती ठराव क्र.११८ दि.१/६/२०१३ अन्वये सविस्तर अहवाल निर्णयार्थ सादर केलेल्या फेरप्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

शहरातील गोरगरीब नागरिकांच्या सेवेसाठी ही सेवा सुरू रहाणे गरजेचे आहे. या करीता महानगरपालिका आवश्यक ते प्रयत्न करीत असून अवैध प्रवासी वाहतूकीबाबत वेळोवेळी बैठका घेवून पाठपुरावा करीत आहे. स्थायी समिती अभिकर्ता संस्थेस वेळोवेळी प्रवाशी तिकीट भाडे वाढ देत आहे व त्यांना येणा-या अडचणी बाबत सकारात्मक भुमिका घेत आलेली आहे. संस्थेने पत्रामध्ये नमुद केलेल्या अडीअडचणी व मागणी याचा विचार करता व ऑफिस रिपोर्टानुसार त्यांना त्यांनी घेतलेल्या खाजगी जागेचे दरमहा जागे भाडे रक्कम रू.६०,०००/- देण्यांस मान्यता देत आहे.नगररचना विभागाने लवकरात लवकर अभिकर्ता संस्थेस जागा उपलब्ध करून देणेबाबत कार्यवाही करावी.प्रवासी कर व बालपोषण अधिभार माफ करणेबाबत मा. शासनाकडे तात्काळ प्रस्ताव सादर करण्यांत येवून त्याचा पाठपुरावा करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

तसेच डिझेल दरवाढीमुळे खर्चात होणारी वाढीमुळे दरमहा डिझेल खर्चातील १० टक्के वाटा महानगरपालिकेने देणेबाबत,अंध- अपंग व विद्यार्थ्यांना प्रवास भाडे दरात देण्यांत येणारे सवलतीची प्रतिपूर्ती महानगरपालिकेने देणेबाबत, बॅक गॅरटीतून रक्कम देणेबाबत तसेच ज्या महिन्यात तोटा होईल त्या तोटा रकमेची प्रतिपूर्ती महानगरपालिकेने करणे ही अशा बाबी पत्रात नमुद केलेल्या आहेत यासर्व बाबी धोरणात्मक स्वरूपाची असल्याने नगरसचिव यांनी सदरचा प्रस्ताव व ठरावासह संपूर्ण प्रकरण मा.महासभे पुढे ठेवणेबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

यावर नगरसचिव यांचेकडुन मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०४ चे ठराव क्रमांक १२१ दिनांक २१/०६/२०१३ अन्वये रिपोर्ट सादर की,

संदर्भ - १. अ.नगर मनपा. मोटार व्हेईकल विभाग २८६ दि.१२/६/२०१३ चा रिपोर्ट फेरसादर.

२. मा.स्थायी समिती सभा क्र.०४ ठराव क्रमांक - १२१ दिनांक २१/६/२०१३.

सादर,

अहमदनगर महानगरपालिकेच्या मोटार व्हेईकल विभागाने मे.प्रसन्ना पर्पल मोबिलिटी सोल्यू.प्रा.लि. चे व्यवस्थापक श्री.दिपक मगर यांनी दिनांक २७/५/२०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवा दि.१ जून २०१३ पासून बंद करणे बाबतचा ऑफीस रिपोर्ट वर मा.स्थायी समिती ठराव क्र.११८ दि.१/६/२०१३ अन्वये सविस्तर अहवाल निर्णयार्थ मा.स्थायी समिती समोर विचारार्थ

फेरसादर केला होता. सदरच्या रिपोर्टवर दिनांक २१/६/२०१३ रोजीच्या मा.स्थायी समिती मध्ये चर्चा होउन ठराव क्र.१२१ दि.२१/६/२०१३ अन्वये पारीत करण्यात आला आहे.

त्यानुसार सदरचा विषय हा तातडीने महासभेसमोर विचारार्थ येणे आवश्यक असल्याने नगरसचिव विभागामार्फत सादर करण्यात यावा असे आदेशीत केले आहे.

सबब संदर्भीय क्र.१ चा रिपोर्ट सह संदर्भीय क्र.२ चा ठराव मा.महासभेपुढे निर्णयार्थ सादर करण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**चर्चा :-**

**मा.श्री.संग्राम जगताप :-** सदर विषयाबाबतचे सविस्तर प्रस्ताव दिलेला आहेच त्यानुसार चर्चा करण्यांत यावी.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** एस.टी.महामंडळ अहमदनगर शहरात शहर बस सेवा चालविणे बाबत तयार असल्याबाबत श्री.बंड यांनी बैठकीमध्ये चर्चेच्या वेळी सांगीतलेले होते. सध्याचे बसचालक मे.प्रसन्ना पर्पल यांना होत असलेल्या तुटीपोटी महानगरपालिके मार्फत कुठल्याही प्रकारची रक्कम देण्यांत येवू नये. महानगरपालिकेने त्यांना तिकीटे छपाई करुन दिली का. दैनंदिन किती तिकीटे विक्री होवून किती रक्कम जमा झाली. किती कर्मचा-यांचे पगारापोटी किती रक्कम वाटावी लागली. कोणत्या हेडवर किती खर्च झाला याची महानगरपालिकेस काहीही माहिती नाही. बससेवेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचारी यांची नेमणूक केलेली नाही. वेळोवेळी संबंधित एजन्सी बस चालवितांना तोटा होत आहे असे म्हणणे पुढे करुन वारंवार बस बंद करणे बाबतची महानगरपालिकेस धमकी देत आहेत. एस.टी.महामंडळाचे शहर बस सेवा चालविणेस तयार असतील तर त्यांचेशी पत्र व्यवहार करावा. मे.प्रसन्ना पर्पल यांचेशी बससेवा सुरु करतेवेळी करारनामा केला त्यामध्ये येणा-या तुटी बाबत काहीच तरतुद केलेली आहे काय ? तुटी बाबत करारनाम्यामध्ये अट नसल्यास महानगरपालिका संबंधितांना तुट भरुन देण्यास जबाबदार कशी राहील.

**मा.आयुक्त साहेब :-** मा.श्री.संग्राम जगताप महापौर असतांना अहमदनगर शहरात बससेवा सुरु केलेली आहे. सदर बससेवा चालू करतांना संबंधित एजन्सींला बससाठी जागा देणे आवश्यक आहे. बसेस साठी शहरातील विविध भागात बस थांबे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदर बससेवा हा चांगला उपक्रम आहे. या उपक्रमास आत्ताच चांगल्या प्रकारे पारितोषीक देवून गौरविण्यांत आलेले आहे. संपुर्ण भारतात अशा प्रकारचा प्रकल्प नाही. सदर बससेवेस नागरिकांचा चांगल्या प्रकारे प्रतिसाद आहे. आम्ही इतर महानगरपालिकांच्या बससेवेची माहिती घेतलेली आहे. बेस्टला वर्षाला २०० ते २५० कोटी तोटा सहन करावा लागत आहे. पिंपरी चिंचवड येथे बससेवेसाठी ४० कोटीचे नुकसान होत आहे. आपल्या येथील बससेवा चालक चांगली सेवा देत आहेत. मी त्यांच्या मताशी १०० टक्के सहमत नाही. आपण त्यांना कर्मचारी दिले नाहीत. बससेवे संदर्भात पुण्याला झालेल्या बैठकीतही चांगल्या प्रकारे चर्चा झालेली आहे. त्यांचे बससेवेचे ऑडीट झालेले आहे. त्यांच्या सर्व कागदपत्र लॉस प्रॉफिट बॅलन्सशीटची शहानिशा केल्याशिवाय त्यांना तोटयापोटी रक्कम देवू शकत नाही. करारनामा महानगरपालिका सभेचे मान्यतेने केलेला आहे. त्यास सभेची मंजूरी आवश्यक आहे. महानगरपालिकेचे दोन अधिकारी नेमुन बससेवेला होणा-या तोटया बाबतचा विषय सभेपुढे घेतला जाईल. आज पर्यंत आपण त्यांना जागा देवू शकलो नाही. जागेच्या भाडयापोटी त्यांना दरमहा रक्कम रुपये ६० हजार द्यावे लागतात. जागा उपलब्ध करुन देणे आपल्यावर बंधनकारक होते. बससेवेचा तोटा शोधण्यासाठी नियुक्त केलेल्या दोन अधिका-यांचा अहवाल आल्यानंतर सभेमध्ये निर्णय घ्यावयाचा आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** महानगरपालिकेने आजपर्यंत त्यांना जागा उपलब्ध करुन दिली नाही. महानगरपालिकेच्या शहरात अनेक मोठमोठया जागा आहेत. संबंधितांनी जागे संदर्भात वेळोवेळी महानगरपालिकेकडे मागणी केलेली आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** बससेवेचे ऑडीट झाल्यानंतर विषय सभेपुढे घ्यावयाचा आहे. दोन महिन्यानंतर विषय येणार आहे. मग त्या संदर्भात चर्चा आत्ताच का.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** महानगरपालिका प्रशासनाने त्यांना आजपर्यंत जागा दिली नसल्याने रक्कम रुपये दरमहा ६० हजारचा भुर्दंड महानगरपालिकेस सोसावा लागणार आहे.

**मा.श्री.अंबादास पंधाडे :-** अमरधाम स्मशानभुमी जवळील जागा आपण बससेवेसाठी त्यांना दिलेली होती. त्यांनी त्या जागेचा वापर करावा.

**मा.श्री.संभाजी कदम :-** संबंधितांनी जागेसंबंधी कोर्ट मॅटर केलेले आहे.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :-** संबंधितांनी प्रथम सदर जागेचा वापर केलेला होता. सदर जागेला तारकम्पौंड केलेले आहे. परंतु जागा मालकाने हायकोर्टामध्ये दावा दाखल केला. नंतर त्यांना जागा खाली करुन द्यावी लागली.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** सदरची जागा ही महानगरपालिका मालकीची नाही काय ? कोर्टाकडुन जागा वापरा संदर्भात मनाई करण्यांत आली की आपण मनाने ठरविले.

**मा.श्री.निखिल वारे :-** सदर जागे संदर्भात नगररचना विभागाने खुलासा करावा.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** सदर जागा वापरतेवेळी महानगरपालिका विधी तज्ञांचे मत विचारात घेतले होते काय. ही जागा वापरासंबंधी काय अडचण होती.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** दरवेळी बसचे दरवाढीसाठी भाडेवाढ केलेली आहे. तरीही संबंधितांना तोटा होतो असे त्यांचे म्हणणे आहे. बससेवा ऑडीट तपासणीसाठी नियुक्त करावयाच्या दोन अधिका-यांचा अहवाल आल्याशिवाय त्यांना पैसे देता येणार नाही. सध्या त्यांना जागा देणे महत्वाचे आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** जुन्या बसस्टॅण्ड मागील जागा देणे बाबत कार्यवाही चालू होती. त्याबाबत पुढे काहीही झाले नाही.

**मा.आयुक्त साहेब :-** पालकमंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीस आरटीओ, एस.टी.महामंडळ, महानगरपालिका चे अधिकारी हजर होते. त्या बैठकीत त्यांनी बस सोडण्यापुरती जागा उपलब्ध करुन देणे बाबत मान्य केलेले आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** शहरातील अवैध वाहतुकी बाबत मा.जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक यांना वेळोवेळी निवेदने दिलेली आहेत. तरी सर्व पॅगोरिक्षावाले यांची आरेरावी वाढत आहे. महानगरपालिके मार्फत राबविण्यांत येणा-या विविध प्रकल्पांना महानगरपालिके मार्फत संरक्षण द्या. महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी यांनी पोलीस अधिक्षक यांचेकडे जावुन अवैध वाहतुक बंद करणे बाबत सर्वांनी प्रयत्न करावेत.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** पॅगो रिक्षामुळे नगर शहरातील व आसपासच्या खेडयातील ५ ते ६ हजार सुशिक्षीत बेरोजगार तरुणांना रोजगार मिळत आहे. बेशिस्त वागणुक करणा-या पॅगो चालकांवर कायद्यानुसार कारवाई करा. रिक्षा वाहतुक दारांचाही विचार करण्यांत यावा.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** शहर बससेवा चालू राहिली पाहिजे. ती महिलांची महत्वाची बाब आहे. बससेवा चालू राहण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावा. बससेवेवर महानगरपालिकेचे अधिकारी नियुक्त करा. त्यावर प्रशासनाचा वचक बसवा. बससेवेच्या धंद्यात कधी नफा तर कधी तोटा हा होणारच त्यामुळे त्यांनी थोडा तोटा झाला म्हणुन बससेवा लगेचच बंद करण्याची महानगरपालिकेस धमकी देवू नये.

**मा.श्री.अशोक बडे :-** शहर बस वाहतुक सेवेसंबंधात मा.आयुक्त साहेब यांनी सविस्तर माहिती दिलेली आहे. दोन - आडीच वर्षापासुन बससेवा चालू आहे. बससेवा पुर्ववत चालू ठेवावयाची असेल तर त्यांना तोटा भरुन येणेसाठी काहीतरी मदत दिली पाहिजे. अशा तोटयात संबंधित बसचालक किती दिवस महानगरपालिकेस सेवा पुरविणार.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** महानगरपालिकेचे दोन अधिकारी नियुक्त केल्यानंतर त्यांच्या अहवालानुसार संबंधित बससेवा चालकास तुट आहे किंवा नाही हे ठरविता येणार आहे. त्यानंतर त्यांना मदत करणे बाबत विचार करावयाचा आहे. तोपर्यंत सर्व नगरसेवकांनी आपले मानधन व वाहन भत्ता द्यावा.

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्टचा विचार करता मा.स्थायी समिती ठरावानुसार शहर बससेवेचा नफा तोटा काढण्याकरीता महानगरपालिकेच्या दोन अधिका-यांची नियुक्ती करण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदर कामी श्री.मेश्राम देवानंद, मुख्यलेखापरीक्षक व श्री.पी.जे.निकम, मेकॅनिकल इंजिनियर यांची नियुक्ती करण्यांत येत आहे. दोन महिन्यानंतर सदर समितीने आपला पडताळणी अहवाल सभेपुढे ठेवावा.

**मा.श्री.अंबादास पंधाडे :-** श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर यांचेकडे यापुर्वीच इतर विभागांचा अतिरिक्त कार्यभार असतांना कमिटीचे काम करता येईल का ?

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे, मा.श्री.किशोर डागवाले :-** बस सेवा चालवत असतांना येणारा दैनंदिन तोटा महानगरपालिके मार्फत मिळणे बाबत संबंधितांनी कधीपासुन मागणी केलेली आहे. तोटा निघाल्यास त्यांना सन २०१३ पासुन देण्यांत यावा. मागील तोटयाची रक्कम देण्यास आमचा विरोध आहे. त्यांना महानगरपालिकेची मोकळी जागा उपलब्ध करुन देण्यांत यावी.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** शहर बससेवा चालवतांना होणारा तोटा संबंधितांना चालू वर्षापासुन देणे बाबतचा विषय मा.स्थायी समितीमध्ये झालेला आहे. बससेवा सुरु झाल्यापासुन येत असलेला तोटा व त्यापोटी द्यावयाची भरपाई यासाठी विषय सर्वसाधारण सभेपुढे घेण्यांत आलेला आहे.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :-** बससेवा सुरु करतेवेळी करारनाम्यामध्ये नमुद केलेल्या अटीनुसार त्यांना वाहन तळासाठी महानगरपालिके मार्फत जागा उपलब्ध करुन दिली जाईल. असे म्हटलेले आहे. त्यानुसार त्यांना महानगरपालिकेने आजपर्यंत वाहनतळासाठी जागा उपलब्ध करुन दिलेली नाही. संबंधितांनी खाजगी जागा भाडे तत्वावर घेवुन त्यासाठी दरमहा रक्कम रु.६० हजार चा खर्च त्यांना येत आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** बससेवा सुरु करतांना केलेल्या करारनाम्यात जर महानगरपालिकेने त्यांना बस साठी जागा उपलब्ध करुन दिली नाही तर त्यांना दरमहा ६० हजार रुपये द्यावेत अशी अट आहे काय ?

**मा.आयुक्त साहेब :-** बससेवा सुरु करतेवेळी केलेल्या करारनाम्यानुसार त्यांना जागा देणे महानगरपालिकेस बंधनकारक होते. आपल्याकडुन आजपर्यंत जागा उपलब्ध होवू शकली नाही त्यामुळे त्यांना दरमहा ६० हजार रक्कम भरावी लागत आहे. सदरचा विषय हा करारनाम्यामध्ये नसल्यामुळे आजच्या सर्वसाधारण सभेपुढे घेतलेला आहे.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** शहर बससेवेच्या वाहनतळासाठी तात्काळ जागा उपलब्ध करुन देण्यांत यावी.

**मा.श्री.दिलीप सातपुते, मा.श्री.किशोर डागवाले :-** बुरुडगांव रोडवर महानगरपालिकेची जुनी कचरा डेपोची जागा आहे. सदर जागा जवळ-जवळ ७ एकरच्या आसपास आहे. त्या जागेस तारकंम्पौंड करुन वापरण्यास हरकत नाही.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** बुरुडगांव रोडवरील कचरा डेपोच्या जागेबाबत माहिती देण्यांत यावी.

**नगररचनाकार श्री.दहे :-** शहरातील कचरा डेपोसाठी महानगरपालिकेने बुरुडगांव रोड येथे भाडे कराराने सदरची जागा घेतलेली होती. सदर जागेवर महानगरपालिकेची मालकी नाही.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** सदरची जागा ही महानगरपालिका ब-याच वर्षापासुन वापरत आहे. उता-यावर इतर हक्कामध्ये महानगरपालिकेचे नांव लागलेले आहे.

**नगररचनाकार श्री.दहे :-** सदर जागेच्या मालकाच्या संमत्तीशिवाय आपण ती जागा शहर बससेवेसाठी वापरु शकत नाही.

**मा.श्री.अंबादास पंधाडे :-** ती जागा आपण सोडलेली नाही.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** व्यवसाय संस्थेस होणा-या तोटया बाबत रिपोर्ट मागवा पुढील विषय घ्या.

**मा.महापौर :-** ऑफिस रिपोर्टप्रमाणे व सभागृहामध्ये झालेल्या चर्चेनुसार प्रसन्ना पर्पल मोबिलिटी प्रा.लि. यांनी दिलेल्या पत्रातील अडीअडचणीचा विचार करता सदर व्यवसाय संस्थेचे जागेचे माहे जुन २०१३ अखेरचे भाडे पोटी होणारी रक्कम महानगरपालिकेने संबंधित अभिकर्ता संस्थेला अदा करावेत. तसेच मा.स्थायी समिती ठरावानुसार दरमहा भाडेपोटी रक्कम रु.६०,०००/- सदर व्यवसाय संस्थेस दरमहा अदा करावी. याकामी श्री.मेश्राम मुख्यलेखापरीक्षक तसेच श्री.परिमल निकम यंत्र अभियंता यांची नियुक्ती करणेत यावी. या अधिका-यांनी येत्या दोन महिन्याच्या आत तोट्याबाबत वस्तुनिष्ठ अहवाल महासभेस सादर करावा. जेणेकरुन महासभेपुढे तोटयातील सहभागाबाबत सूत्र ठरविता येईल व त्यानुसार अंतिम निर्णय घेण्यात येईल. तसेच मा.स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार प्रवासी कर व बाल पोषण कर खास बाब म्हणुन माफ करणे बाबत मा.शासनास विनंती करण्यात यावी.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्टप्रमाणे व सभागृहामध्ये झालेल्या चर्चेनुसार प्रसन्ना पर्पल मोबिलिटी प्रा.लि. यांनी दिलेल्या पत्रातील अडीअडचणीचा विचार करता सदर व्यवसाय संस्थेचे जागेचे माहे जुन २०१३ अखेरचे भाडे पोटी होणारी रक्कम रु.१५.६० लक्ष महानगरपालिकेने संबंधित अभिकर्ता संस्थेला अदा करावेत. तसेच मा.स्थायी समिती ठरावानुसार दरमहा भाडेपोटी रक्कम रु.६०,०००/- सदर व्यवसाय संस्थेस दरमहा अदा करावी. सदर व्यवसाय संस्थेस होणा-या तोटया बाबत सहभाग घेण्याबाबत ही सभा तत्वतः सहमती देत आहे.

तथापि याबाबत पडताळणी करणेकामी दोन महानगरपालिका अधिका-यांची नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे. याकामी श्री.मेश्राम मुख्यलेखापरीक्षक तसेच श्री.परिमल निकम यंत्र अभियंता यांची नियुक्ती करणेत यावी. सदर बाबत संबंधीत व्यवसाय संस्थेने महानगरपालिकेस योग्य ते सहकार्य करावे. या अधिका-यांनी येत्या दोन महिन्याच्या आत तोट्याबाबत वस्तुनिष्ठ अहवाल महासभेस सादर करावा. जेणेकरुन महासभेपुढे तोटयातील सहभागाबाबत सूत्र ठरविता येईल व त्यानुसार अंतिम निर्णय घेण्यात येईल. तसेच मा.स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार प्रवासी कर व बाल पोषण कर खास बाब म्हणुन माफ करणे बाबत मा.शासनास विनंती करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.अशोक किसन बडे,

अनुमोदक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे, सही/-

ठराव सर्वानुमताने मंजूर. महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : १६** **दिनांक : ११ / ०७ /२०१३.**

---

**प्रस्तावाचा विषय :** मा.केंद्रशासीत UIDSSMT योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेच्या १) सावेडी भुयारी गटार योजना व २) केडगांव/ सारसनगर भुयारी गटार योजना या योजनांचा एकत्रित प्रकल्प अहवालास मा.महासभेची मान्यता मिळणे बाबत..

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : १) मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडे दिनांक ०८/०१/२०१३ रोजी होणा-या आढावा बैठकीपूर्वी मा.आयुक्त यांना दिलेले निर्देश

२) मा.उपसंचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे यांना निर्देशित पत्र क्र. नपप्रस/ UIDSSMT/अहमदनगर /२०१३/ कक्ष -१३ दि.०८/०१/२०१३

३) मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे येथे दि. ०४/०४/२०१३ रोजीची बैठक

४) मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. यांचेकडील जा.क्र. ९०१ दि. २६/०४/२०१३ रोजीचे पत्र

५) म.न.पा. चे जा.क्र. ३३१ दि. १९/०६/२०१३ चे पत्र

६) मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. यांचेकडील जा.क्र. १३३६ दि. २८/०६/२०१३ रोजीचे पत्र

"अहमदनगर महानगरपालिकेमार्फत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणेसाठी विविध योजनेंचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी म.न.पा. च्या सार्व.बांधकाम विभागामार्फत मे.सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि. यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांनी खालीलप्रमाणे नमूद योजनांची DPR म.न.पा. स सादर केलेले होते.

१) सावेडी भुयार गटार योजना व २) केडगाव भुयारी गटार योजना

या योजना मा.केंद्र शासनाच्या UIDSSMT योजनेअंतर्गत सादर करण्यात आल्या असता सदर योजनेनां मा.राज्य शासनाच्या अनुक्रमे ६ व्या व ८ व्या SLSC मिटींगमध्ये मान्यता प्राप्त झालेली असून सदर योजना निधी प्राप्तीसाठी मा.केंद्रशासनाकडे सादर करण्यात आले होते. परंतू त्यांचेकडून निधी प्राप्त झालेला नाही.

दरम्यान मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मा.आयुक्त, म.न.पा. यांना या दोनही योजनांचे प्रकल्प अहवाल चालू दरसुचीनुसार नव्याने मा.शासनास सादर करणे बाबत निर्देश दिले. तद्नुसार सदर योजनांचे सन २०११-२०१२ चे दरसुचीनुसार अंदाजपत्रके व प्रकल्प अहवाल मे. सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि. लातूर यांचेकडून तयार करून त्यास ठराव क्र. ४२ दि. ३०/०१/२०१३ अन्वये मा. महासभेची मंजूरी घेवून सदरचे प्रस्ताव मा.शासनास सादर करण्यात आले होते. त्यास दि.१५ /०१/ २०१३ रोजीच्या १६ व्या SLSC च्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे मान्यता प्राप्त झाली.

| | | |
|---|---|---|
| १) सावेडी भुयार गटार योजना | - | रू. १००.४९५ कोटी |
| २) केडगाव भुयारी गटार योजना | - | रू. ८२.२८७ कोटी |

या योजनांसह महाराष्ट्रातील सर्व योजनांचे तांत्रिक पडताळणी करणेकामी मा.केंद्रशासनाच्या CPHEEO चे मा.डयेपूटी अॅडव्हायझर श्री.रविदंर यांनी दि. ०४/०४/२०१३ रोजी मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे येथे आढावा घेतला. त्यावेळी सादर केलेल्या DPR मध्ये त्यांनी काही दुरूस्त्या करणे बाबत सुचविले. त्यानुसार मा.मुख्य अभियंता यांचे संदर्भिय पत्र क्र. ४ चे पत्र इकडेस प्राप्त झाले असून CPHEEO च्या सदस्यांनी सुचविलेल्या दुरूस्त्या त्वरीत करून सुधारीत प्रकल्प अहवाल सादर करणे बाबत सुचना केलेल्या होत्या. यात प्रामुख्याने दोनही प्रकल्प अहवाल हे एकाच शहराचे असल्याने एकत्रितरित्या सादर करणे बाबत निर्देश दिले.

CPHEEO चे मा.डयेपूटी अॅडव्हायझर श्री.रविदंर यांनी केलेल्या सुचनेनुसार "अहमदनगर भुयारी गटार योजना " सुधारीत एकत्रित सविस्तर प्रकल्प अहवाल यापूर्वीचे मे.सॉलीड कोअर कन्सलटंट प्रा.लि. यांचेकडून तयार करून मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे यांचेकडे तांत्रिक मंजूरी करिता संदर्भ पत्र क्र. ५ अन्वये सादर करण्यात आले होते. सदरच्या प्रकल्पास संदर्भिय पत्र क्र.६ अन्वये मा.मुख्य अभियंता यांची रू. २७९.५० कोटीच्या रक्कमेस तांत्रिक मंजूरी प्राप्त झाली असून सदरचा अहवाल मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय (SLNA) यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे.

विषयांकित प्रस्तावास प्राप्त झालेल्या मा. मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे यांचेकडून तांत्रिक मंजूरी प्राप्त झालेली असल्याने सदरचा प्रस्ताव अहमदनगर शहरामध्ये राबविण्यासाठी रू. २७९.५० कोटीच्या च्या खर्चास मा.महासभेची मंजूरी घेवून सदरचा ठराव मा.शासनास सादर करणे आवश्यक आहे.

करिता मा.केंद्रशासित UIDSSMT योजनेअंतर्गत " अहमदनगर शहर भुयारी गटार योजना " अहमदनगर शहरामध्ये राबविण्यासाठी रू. २७९.५० कोटीच्या च्या खर्चास मा.महासभेची मंजूरी करिता ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मा.महासभेच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मा.महासभेच्या मंजुरीसाठी सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, यंत्र अभियंता यांचे शिफारशीप्रमाणे मंजुरीस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अहवालानुसारचा प्रस्ताव मा.महासभेपुढे मान्यतेस्तव ठेवण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचाअभिप्राय की, मान्य.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

अशा बाबतचा ऑफिस प्रस्ताव मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपायुक्त (सा), मुख्यलेखापरीक्षक, मुख्यलेखाधिकारी, पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :-** सावेडी भुयारी गटार योजना व केडगांव सारसनगर भुयारी गटार योजना मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने मा.राज्य शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यांत आलेली होती. त्यांची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर दोनही योजनांचे प्रस्ताव मा.केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविणे आवश्यक होते. संपुर्ण महाराष्ट्र राज्यातुन एकुण ४२ प्रस्ताव आलेले होते. त्यात त्यांनी आपणांस अशी सूचना दिली की, हे दोनही प्रस्ताव एकत्रित करुन पाठवा. त्यानुसार दोन्ही प्रस्ताव एकत्र करुन मंजूरी घेवून दिल्ली येथे मंजूरीसाठी पाठविण्यांत आलेले आहेत. सदर भुयारी गटर योजनेकरीता २७९.५० कोटीच्या खर्चास मा.महासभेची मंजूरी आवश्यक आहे.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** अहमदनगर शहरामध्ये नुकतेच रस्ते चांगल्या प्रकारे करण्यांत आलेले आहेत. सदरची भुयारी गटार योजना राबवितांना फोडलेले रस्ते दुरुस्ती करणेकामी तरतुद करणे आवश्यक आहे. रस्ते दुरुस्तीची तरतुद करण्यांत यावी व त्यासाठी अनुदान मागणी करावी.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :-** भुयारी गटार योजना राबवितांना तुटलेले रस्ते दुरुस्ती करीता लागणा-या रक्कमेची तरतुद केलेली आहे. आपण त्याकरीता ५० कोटींची मागणी केलेली आहे.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** रस्ता दुरुस्तीसाठी मागणी केलेले ५० कोटी पुरणार नाहीत.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** भुयारी गटार योजना हा प्रोजेक्ट चांगला आहे. आपण वेळोवेळी अंदाजपत्रकात तरतुद करतो पण आता प्रत्यक्षात सुरुवात झालेली आहे. मोठमोठे प्रोजेक्ट झाले त्यांचेसाठी अंदाजपत्रकात तरतुद केली. काही योजनांसाठी निधी आलेला आहे. त्यातील काही चांगल्या योजना बंद झालेल्या आहेत. त्या सध्या कोणत्या स्टेजवर आहेत याची माहिती द्यावी. फेज-२ चे काम दोन वर्षापासुन चालू आहे. वॉर्डात किरकोळ पाईपलाईनचे काम सांगीतलेस फेज-२ ची सबब सांगतात. महानगरपालिके मार्फत संपुर्ण निधी वापर केला जात नाही. ही प्रशासनाची जबाबदारी आहे. चांगल्या चांगल्या योजना तातडीने पुर्ण केल्या पाहिजेत.

**मा.आयुक्त साहेब :-** मी आपल्या मताशी सहमत आहे. काही कारणांमुळे या योजनांची कामे वेळेत पुर्ण करता येवू शकलेली नाही. यामुळे नविन निधी मागणीसाठी शासनाकडे पाठपुरावा केल्यास त्यांचेकडुन मागील वितरीत केलेल्या निधींच्या कामांच्या प्रगती बाबत विचारणा केली जाते. फेज-२ च्या कामावर नियुक्ती केलेल्या मे.स्टड कॉम कन्सल्टंट बाबत काही तक्रारी होत्या त्या तक्रारींचा निपटारा करणेकामी त्यांना संधी देण्यांत आलेली होती. त्यांनी कोणतेही काम वेळेत पुर्ण करुन दिलेले नाही. त्यांची महानगरपालिकेसाठी एजन्सी म्हणुन केलेली नियुक्ती रद्द केलेली आहे. त्यानंतर त्यांचेकडील कामाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची नियुक्ती केलेली आहे. त्यांनी वर्कींग सर्व्हे केलेला असुन त्या कामास गती मिळालेली आहे. त्यातच मध्यंतरीच्या काळात काही पाईप बदल झालेले आहेत याचाही विचार करावा लागेल. त्यात महानगरपालिकेचे पैसे वाचणार आहेत. व आपले काम लवकर होणार आहे. केडगांव योजना पुर्ण होत आलेली आहे. वैयक्तीक कनेक्शन देणे बाकी आहे. वेगवेगळया प्रकारची कामे होती सदर केडगांव योजनेचे काम माहे डिसेंबर २०१३ पर्यंत पुर्ण होतील अशी आशा आहे. तसेच वेगवेगळया ठिकाणी उभारण्यांत येणा-या टाक्यांचे कामांकरीता मा.शासनाने डेड लाईन दिलेली होती. परंतु सदरची कामे पुर्ण होवू शकली नाहीत.

**मा.श्री.शेख हाजी नजीर :-** फेज - २ अंतर्गत मुकुंदनगर भागात टाकण्यांत येणा-या पाण्याच्या लाईनी या रस्त्याच्या मधोमध गेलेल्या आहेत. संबंधितांना मी याची वेळोवेळी कल्पना देवुनही कामात सुधारणा करण्यांत आलेली नाही.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** संपुर्ण शहराची फेज-२ योजना ही भविष्य काळातील मोठी योजना असुनही या योजनेवर साईटवर सुपरव्हीजन करणे करीता महानगरपालिकेचा एकही कर्मचारी फिरकत नाही. ठेकेदार परस्पर त्याच्या मनानेच लाईन टाकणेचे काम करीत आहे. लेव्हल पाहिली जात नाही.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** मी माझ्या प्रभागामध्ये काही भागात फेज-२ अंतर्गत पाण्याच्या लाईन टाकणे बाबत यादी दिलेली होती. तरी ती कामे त्वरीत सुरु करावीत.

**मा.आयुक्त साहेब :-** माहे एप्रिल २०१३ मध्ये वर्किंग सर्व्हे झालेला आहे. थोडयाच कालावधीत काम सुरु करता येईल.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** वर्किंग सर्व्हे झाल्यानंतर काम सुरु का केले नाही.

**मा.आयुक्त साहेब :-** मे स्टड कॉम कन्सल्टंट ने काम केलेले नाही. त्यामुळे त्यांची एजन्सी रद्द करणेकरीता वेळ गेलेला आहे. नविन एजन्सीची नेमणुक केलेली आहे. त्यांना काम करु द्या.

**मा.महापौर साहेब :-** भुयारी गटार योजनेच्या विषयावर बोला तो महत्वाचा नाही का ? फक्त अजेंडयावरील विषयच घेण्यांत यावेत.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** महानगरपालिकेच्या विविध योजनांवर काम करणा-या लोकांना माहिती द्या. संबंधित एजन्सीच्या कामावर महानगरपालिकेचे कर्मचारी जात नाहीत. त्यांच्या कामाची तपासणी होणे आवश्यक आहे. महानगरपालिके मार्फत सुपरव्हीजन केले जात नाही.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** सावेडी, केडगांव, सारसनगर भुयारी गटार योजनेचा विषय मंजूर करणेत यावा. पुढचा विषय घ्यावा.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** विषय यापुर्वीच मंजूर आहे. फेरसादर झाल्याने चर्चा करा.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** विषय मंजूर करा. पुढचा विषय घ्या.

**मा.श्री.सचिन पारखी :-** महानगरपालिके मार्फत महानगरपालिका हद्दीत राबविण्यांत येणा-या विविध योजनांचे डी.पी.आर. सर्व नगरसेवकांना देण्यांत यावेत. त्यातील बाबींची नगरसेवकांना माहिती होईल. विषय मंजूर करावा.

**मा.आयुक्त साहेब :-** प्रत्येक नविन प्रकल्पांचा डी.पी.आर. हा अंदाजे ४०० ते ५०० पानांचा असतो. सर्व नगरसेवकांना तो छायांकित करुन देणे शक्य होणार नाही. ज्यांना अभ्यासावयाचा असेल त्यांनी संबंधित विभागाकडे येवुन त्याचा अभ्यास करावा.

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत येत आहे. खर्च मंजूर करण्यांत येत आहे. संपुर्ण प्रकरण पुढील मंजूरीसाठी मा.शासनाकडे पाठवावे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्टप्रमाणे व सभागृहामध्ये झालेल्या चर्चेनुसार मा.केंद्रशासीत UIDSSMT योजने अंतर्गत मा.CPHEEO यांनी दिलेल्या सूचनेनुसार १) सावेडी भुयारी गटार योजना व २) केडगांव/ सारसनगर भुयारी गटार योजना यासह शहराचा उर्वरीत भाग याचा एकत्रित प्रकल्प अहवालास तसेच याकामी येणा-या रक्कम रू.२७९.५० कोटीच्या खर्चास व त्यानुसार अहमदनगर शहर भुयारी गटार योजना राबविण्यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.दिलीप नानाभाउ सातपुते

अनुमोदक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १७** **दिनांक : ११ / ०७ /२०१३.**

---

**प्रस्तावाचा विषय :** UIDSSMT योजने अंतर्गत (१) अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज - २. (२) केडगाव पाणी पुरवठा योजना या योजना अंतर्गत पाणी वितरण व्यवस्था तसेच वितरण व्यवस्थे अंतर्गत HDPE पाईप्स वापरणेस व त्या अनुषंगाने खर्चास मा.महासभेची मंजुरी मिळणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : १) कार्यकारी अभियंता, PMC सेवा विभाग, म.जी.प्रा. यांचे जा.क्र. तांशा/२७०/ दि. १७/०४/२०१३ रोजीचे पत्र.

२) कार्यकारी अभियंता, PMC सेवा विभाग, म.जी.प्रा. यांचे जा.क्र. केडगाव/ ३१०/ दि. ०२/०५ / २०१३ रोजीचे पत्र.

३) मा.आयुक्त यांचे दालनात दि.०४/०५/२०१३ रोजीची आढावा बैठक

४) मा.महापौर यांनी दि. १६/०५/२०१३ रोजी घेतलेली बैठक.

विषयांकित योजनेस मा.केंद्रशासनाची मंजूरी मिळाली असून योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

यातील अहमदनगर शहर पाणीपुरवठा योजना फेज-२ या योजनेचा मुळ सर्व्हे सन २००६-२००७ मध्ये करण्यात आलेला आहे. सदर योजनेस सन २००८ मध्ये मंजुरी प्राप्त झालेली असुन प्रत्यक्षात निधी १२/११/२००९ रोजी मनपास प्राप्त झाला असुन निविदा दि.२१/४/२०१० रोजी अंतिम करण्यात आलेली आहे. तसेच केडगाव प्रभाग पाणीपुरवठा योजनेअंतर्गत मुळ सर्व्हे सन २००५-२००६ मध्ये करण्यात आलेला आहे. सदर योजनेस माहे ऑगस्ट २००७ मध्ये मंजुरी प्राप्त झाली असुन प्रत्यक्षात निधी दि. २६/३/२००८ रोजी मनपास प्राप्त झाला असुन त्याच्या निविदा माहे ऑक्टोबर २००८ मध्ये अंतिम करण्यात आलेल्या आहेत.

सद्यस्थितीत केडगाव पाणीपुरवठा योजनेतील मुळ वितरण व्यवस्थेचे काम पुर्ण झालेले असुन फेज-२ चे काम प्रगतीपथावर आहे.

केडगाव प्रभाग व अहमदनगर शहर पाणीपुरवठा फेज-२ अंतर्गत वाढीव भागात वितरण व्यवस्था राबविणे गरजेचे वाटते. त्याबाबत सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे

१) **अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज - २ :**

सदरच्या योजनेस मा.केंद्रशासनाची रू. ७३.०५ कोटीच्या खर्चास सन २००८ मध्ये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरच्या कामाचा कार्यारंभ आदेश दि. २१/०६/२०१० रोजी मे.तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV यांना देण्यात आलेला आहे. सदरच्या योजनेस स्विकृत निविदेनुसार रू. ११६.०७ कोटीच्या खर्चास मा.स्थायी समितीचा ठराव क्र. २ दि. २१ / ४ / २०१० मान्यता मिळालेली आहे.

विषयाकिंत योजनेचे काम मे.तापी प्रिस्ट्रेस प्रोडक्ट JV यांचेमार्फत प्रगतीपथावर असून या कामासाठी मे.स्ट्रडकॉम कन्सलटंट प्रा.लि. पुणे यांची PMC म्हणून नेमणूक करण्यात आली होती. परंतू सदरच्या PMC ने योजने बाबतची तांत्रिक कामे, उर्ध्वनलिका, गुरूत्ववाहिनी व वितरण व्यवस्थेचा वर्कींग सर्व्हे वेळेत केला नसल्यामुळे त्यांची सेवा माहे सप्टेंबर २०१२ मध्ये रद्द करण्यात आली. त्यानंतर म.जी.प्रा. ची PMC म्हणून नेमणूक करण्यात आली.

विषयांकित योजनेचे अंदाजपत्रक सन २००६-२००७ मध्ये झाले असल्याने गेल्या ५ वर्षात लोकवस्तीत वाढ झाली असल्याने प्रथमतः योजनेचा वर्कींग सर्व्हे करणे बाबत म.जी.प्रा. स सुचित करण्यात आले होते. त्यानुसार सदरचा वर्कींग सर्व्हेचा अहवाल माहे नोंव्हेबर २०१२ मध्ये सादर करणार असल्याचे म.जी.प्रा. कडून सांगण्यात आले होते. परंतू म.जी.प्रा. ने विषयांकित योजनेचा वर्कींग सर्व्हेचा अहवाल संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये म.न.पा. स सादर केलेला आहे. सदरचे कामास म.जी.प्रा. कडून ४ महिने विलंब झालेला आहे.

सदरच्या योजनेचा वर्कींग सर्व्हेचा अहवाल संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये म.न.पा.स प्राप्त झालेला आहे. मंजूर योजनेमध्ये ३५५ कि.मी. चे वितरण व्यवस्थेचे जाळे प्रस्तावित होते. परंतू सदरचा अहवाल पाहता या योजनेमध्ये जवळपास २०९ कि.मी. ने वाढ झालेली आहे. सदरच्या वर्कींग सर्व्हेमध्ये केडगाव प्रभाग वगळता इतर भागाचा समावेश केलेला आहे.

दि. ०४/०४/२०१३ रोजी मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे येथे झालेल्या बैठकीत मा.केंद्रशासनाच्या CPHEEO चे डेप्यूटी ॲडव्हायझर यांचे सुचनेनुसार १०० व १५० एम.एम. डी.आय.पाईप्स ऐवजी ११० व १६० एम.एम. व्यासाचे HDPE पाईप्स वापरणे बाबत सुचना केलेल्या आहेत. त्यानुसार वितरण व्यवस्थेसाठी १०० व १५० एम.एम. डी.आय. पाईप्स ऐवजी ११० व १६० एम.एम. व्यासाचे HDPE पाईप्स वापणे बाबतचे विवरणपत्र/ अंदाजपत्रक म.जी.प्रा. ने सादर केलेले आहे.

यामध्ये मंजूर निविदेनुसार सर्व डी.आय. पाईप्स वापरल्यास वितरण व्यवस्थेच्या कामासाठी रू. ७०.०३ कोटीच्या ऐवजी रू. १०३.२० कोटी खर्च येणार आहे. तसेच काही अतिरिक्त बाबी (EIRL) चे काम देखील करावे लागणार आहे. त्यामुळे योजनेचे कामास अंदाजे रू. १५१.७४ कोटी इतका खर्च होण्याची शक्यता आहे.

परंतू वितरण व्यवस्थेमधील १०० व १५० एम.एम. डी.आय. पाईप्स ऐवजी ११० व १६० एम.एम. व्यासाचे HDPE पाईप्स वापरल्यास त्यासाठी रू. ७४.६१ कोटी इतका खर्चाची शक्यता असून अतिरिक्त बाबी व कलम ३८ साठी अंदाजे रू. २.५१ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे सदरच्या योजनेचे संपूर्ण काम अंदाजे रू. १२३.२३ कोटी मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे. यानुसार विषयांकित योजनेसाठी अंदाजे रू. ७.१६ कोटी जास्तीचा खर्च लागणार आहे.

**२) केडगाव पाणी पुरवठा योजना**

सदरच्या योजनेस मा.केंद्रशासनाची रू. २५.३९ कोटीच्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. तसेच स्विकृत निविदेनुसार सदरच्या योजनेची किंमत रू. ३९.७३ कोटी इतकी झालेली आहे. या योजनेचे काम मंजूर निविदेनुसार भौगोलिक दृष्टया पूर्ण झालेले आहे.

विषयांकित योजनेमध्ये वितरण व्यवस्थेचे वर्कींग सर्व्हे करणे बाबत म.जी.प्रा.स कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांचेकडील संदर्भिय पत्र क्र. २ इकडेस प्राप्त झाले असून त्यांनी केडगाव परिसरातील नगर - पुणे महामार्ग च्या बाजूचा ताराबाग, श्रीराम कॉलनी, इंडस्ट्रीयल इस्टेट, एकता कॉलनी, अमीतनगर, डागवाले मळा, जयभिम हौसींग सोसायटी, अरणगाव रोडवरील हनुमाननगर, विदयानगर, इदिरानगर इत्यादी भागासाठी वर्कींग सर्व्हे करून त्याचे ड्रॉइंग व डिझाइन म.न.पा.स सादर केलेले आहे. त्यासाठी अंदाजे रू.२९८.७० लक्ष इतका खर्च मंजूर योजनेच्या व्यतिरिक्त अपेक्षित आहे.

दि. ०४/०४/२०१३ रोजी मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे येथे झालेल्या बैठकीत मा.केंद्रशासनाच्या CPHEEO चे डेप्यूटी ॲडव्हायझर यांचे सुचनेनुसार १०० व १५० एम.एम. डी.आय.पाईप्स ऐवजी ११० व १६० एम.एम. व्यासाचे HDPE पाईप्स वापरणे बाबत सुचना केलेल्या आहेत. त्यानुसार वितरण व्यवस्थेसाठी १०० व १५० एम.एम. डी.आय. पाईप्स ऐवजी ११० व १६० एम.एम. व्यासाचे HDPE पाईप्स वापणे बाबतचे विवरणपत्र/ अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

वरील नमूद भागात वितरण व्यवस्थेचे काम करणेसाठी अंदाजे रू. २९८.७० लक्ष इतका खर्च अपेक्षित असल्याने येणा-या खर्चास व १०० व १५० एम.एम. डी.आय. पाईप्स ऐवजी ११० व १६० एम.एम. व्यासाचे HDPE पाईप्स वापरणेसाठी मा.महासभेची परवानगी घेणे आवश्यक आहे.

त्यामुळे वरील नमूद दोनही योजनांसाठी उर्वरीत कामासाठी डी.आय. पाईप्स ऐवजी HDPE पाईप्स वापरणेसाठी मा.महासभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. तसेच त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांची तांत्रिक मंजूरी घेवून मा.केंद्र शासनाची अंतीम मंजूरी घेणे आवश्यक आहे.

करिता

१) अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज -२ साठी वर्कींग सर्व्हेनुसार संपूर्ण शहराचे वितरण व्यवस्थेचे काम करणेस व या अनुषंगाने होणा-या अतिरिक्त अंदाजे रू. ७.१६ कोटी खर्चास मा.महासभेची मंजूरी घेणेस

२) केडगाव पाणी पुरवठा योजनेचे अहवालात नमूद भागात [नगर - पुणे महामार्ग च्या बाजूचा ताराबाग, श्रीराम कॉलनी, इंडस्ट्रीयल इस्टेट, एकता कॉलनी, अमीतनगर, डागवाले मळा, जयभिम हौसींग सोसायटी, अरणगाव रोडवरील हनुमाननगर, विदयानगर, इदिरानगर इत्यादी] वाढीव वितरण व्यवस्थेचे काम करणेस व त्याकामी येणारे २.९९ कोटी खर्चास मा.महासभेची मंजूरी घेणेस

ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव सादर.

यावर उपअभियंता यांचा अभिप्राय की, अहमदनगर शहर पा.पु.योजना फेज-२ व केडगांव प्रभाग पा.पु.योजना या दोनही योजने अंतर्गत वाढीव सलग्न भागासाठी वितरण व्यवस्था राबविणेस तसेच सदर वितरण व्यवस्था राबविणेकामी मा.केंद्रशासनाच्या CPHEEO संस्थेच्या निर्देशाप्रमाणे HDPE पाईप्स वापरणेस व याकामी येणारे वाढीव खर्चास मा.महासभेच्या मंजुरीस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे व यंत्र अभियंता यांचे अभिप्रायाप्रमाणे केडगांव पाणीपुरवठा योजना व शहर पाणीपुरवठा योजना फेज-२ चे कामास मा.केंद्र शासनाचे CPHEEO चे डेप्युटी डायरेक्टर यांचे निर्देशाप्रमाणे HDPE पाईप्स वापरणेस व त्याकामी येणा-या वाढीव खर्चास मा.महासभेच्या मान्यतेस्तव मा.महासभेपुढे ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अहवालातील अ नुसारचा प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अ नुसार मान्य.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, निर्णयास्तव प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणेत यावा.

अशा बाबतचा ऑफिस प्रस्ताव मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपायुक्त (सा), मुख्यलेखापरीक्षक, उपअभियंता यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

चर्चा :- नाही.

मा.महापौर साहेब :- ऑफिस रिपोर्ट मंजूर प्रस्ताव मा.शासनाकडेस पाठविणेत यावा.

---*---

**ठराव :-**

अहमदनगर महानगरपालिकेत मा.केंद्रशासनाच्या UIDSSMT योजने अंतर्गत चालू असलेल्या अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना  फेज - २ या योजनेकरीता, या योजनेचे PMC महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सादर केलेल्या वर्कींग सर्व्हेनुसार वाढीव वितरण व्यवस्था राबविणेस, उर्वरीत कामासाठी १५० एम.एम. व १०० एम.एम. व्यासाकरीता DI ऐवजी HDPE पाईप्स वापरणेस मान्यता देण्यांत येत आहे. वर्कींग सर्व्हेनुसार वाढीव वितरण व्यवस्था राबवितांना येणारे जादाचे / वाढीव खर्चास मान्यता देण्यांत येत असुन  याबाबत मा.शासनाच्या मंजूरीची आवश्यकता असल्यास मा.शासनाकडे मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्यांत यावा.

तसेच ऑफिस रिपोर्ट मध्ये नमूद केल्याप्रमाणे इंदिरानगर, ताराबाग कॉलनी, श्रीराम कॉलनी, अरणगांव रोड इत्यादी भागाकरीता या योजनेचे PMC  महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी केलेल्या नविन सर्वेक्षणानुसार वितरण व्यवस्था केडगांव प्रभाग पाणीपुरवठा योजने अंतर्गत राबविणेस ही मान्यता देण्यांत येत असून प्रस्तावानुसार खर्चासही मान्यता देण्यांत येत आहे. सदरचा खर्च हा मा.शासन निधी, १३ वा वित्त आयोग, मनपा निधी इ. यामधुन करण्यांत यावा. नमूद प्रस्तावानुसार वाढीव तसेच तद्नुषंगिक शासकीय सह खर्चास देखील मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.अशोक किसन बडे,

अनुमोदक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : १८** **दिनांक : ११ / ०७ /२०१३.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर शहर वाहतूक आराखडा तयार करणेस मा.महासभेची मंजूरी मिळणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ- मा.आयुक्त यांचे दालनात दिनांक १४/०६/२०१३ रोजी झालेली बैठक.

उपरोक्त विषयाबाबत विनंती रिपोर्ट की, तत्कालीन नगरपरिषद अस्तित्वात असतांना अहमदनगर शहराची सन १९९९ ला हद्द वाढ होवून त्यामध्ये लगतच १२ गावे समाविष्ट करण्यात आली. तद्नंतर सन २००३ ला महानगरपालिकेची स्थापना झाली.

अहमदनगर शहराच्या मध्यवर्ती भागासह (जुने शहर) व समाविष्ठ झालेली गावे/ उपनगरांकरीता नागरी सुविधा पुरवितांना करावा लागणारा खर्च व त्यासाठी लागणारा निधी कमी पडत असल्याने नविन विकास कामे करताना निधीची समस्या सातत्याने निर्माण होत आहे.

तसेच अत्यावश्यक नागरी सुविधा बरोबर शहरासह उपनगरातील वाहतूक व्यवस्था अद्यावत होणे आवश्यक आहे. त्यासाठी रस्ते, वाहनतळ, पदचारी मार्ग, आपत्कालीन पर्यायी / समांतर रस्ते इत्यादी बाबी विचारात घेवून व त्यांचा समाविष्ट करुन त्या दृष्टीने सुधारणा करणे गरजेचे आहे. परंतू या सर्व गोष्टींसाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता असून महानगरपालिकेस आजच्या परिस्थितीत सदरचा खर्च करणे शक्य होणार नाही.

अशा प्रकारे नागरी सुविधांसाठी मा.केंद्र शासनाकडून निधी मिळतो. परंतू त्यासाठी आपणास मा.शासन निर्देशानुसार आवश्यकत्या सर्व बाबींचा समावेश करुन शहर वाहतूक आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

मा.केंद्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील JNNURM या योजने अंतर्गत शहर वाहतूक आराखडा (CMP) तसेच या अंतर्गत तयार करण्यात येणा-या DPR ला निधी मिळू शकतो. याबाबत मा.डायरेक्टर, JNNURM (Transport) यांचेशी नवी दिल्ली येथे चर्चा देखील झालेली आहे. महानगरपालिकेने शहर बस वाहतूक करीता DPR बनविण्यास त्यास निधीही मिळू शकेल.

मा.केंद्रशासनाच्या K-१४०११/९२/२००९-UT dated August ८, २०११ पत्रा अन्वये DPR बनविणेकामी येणारा खर्च, परत महानगरपालिकेस मिळू शकतो.

DPR बनविनेकामी मा.केंद्रशासनाच्या नगरविकास विभागाने त्यांचेकडील पत्र No.K-१४०११/०७/०७-UT, Dated २६ th March २००७ अन्वये मे.अर्बन मार्स ट्रान्सीस्ट कंपनी (UMTC) ही कंपनी मा.केंद्रशासनाची जाईन्ट व्हेंचर कंपनी असल्याचे त्यांचे वतीने याबाबतीतील सल्ला/काम करुन घ्यावे असे सूचीत केलेले आहे.

त्यामुळे DPR बनविणेकामी मे.UMTC (Urban Mars Transist Company Limited), ची नेमणूक करता येवू शकेल. तसेच DPR बनविणेकामी अंदाजे खर्च रु.४०.०० लाख (रुपये चाळीस लाख) इतका येवू शकेल.

परंतू विषयांकित नमूद बाब ही धोरणात्मक स्वरुपाची असल्याने सदरचा प्रस्ताव मा.महासभेसमोर चर्चेसाठी ठेवून मा.महासभेच्या निर्णया नुसार पुढील कार्यवाही करणे संयुक्तीक राहील.

तथापि आपले आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केलेनुसार मान्य.

यावर मा.महापौर सो, यांचा अभिप्राय की, निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेवणे.

अशा बाबतचा ऑफिस प्रस्ताव मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपायुक्त (कर) यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- शहर वाहतुक आराखडा तयार करणेकामी तयार करावयाचा डी.पी.आर बनविणेस पीएमसीची नेमणुक करणार काय ?

मा.आयुक्त साहेब :- शहराची दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत आहे. त्याचा शहर वाहतुकीवर परिणाम होत आहे. भविष्य काळाची गरज पाहता वाहतुक आराखडा तयार होणे गरजेचे आहे. त्या करीता रस्त्याचे नियोजन होणेही गरजेचे आहे. सदर आराखडयातील सुधारणा शहरात राबविण्यासाठी मोठया प्रमाणावर निधीची आवश्यकता भासणार आहे. आजच्या परिस्थितीत सदरचा खर्च करणे महानगरपालिकेस शक्य होणार नाही. मा.केंद्र शासनाच्या नगरविकास विभागाकडुन योजनेमधुन शहर वाहतुक आराखडयासाठी निधी मिळू शकतो तसेच डी.पी.आर.बनविणेसही निधी मिळणार आहे. डी.पी. आर. बनविणे कामी केंद्रशासनाची कंपनी मे.अर्बन मार्स ट्रान्सीट कंपनी यांचेकडुन काम करुन घेणे बाबत सूचित केले आहे. धोरणात्मक बाब असल्याने मा.सभेने निर्णय घ्यावयाचा आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.अशोक बडे :- रिपोर्ट मंजूर करावा.

मा.महापौर :- ऑफिस रिपोर्ट नुसार मंजूरी देणेत येत आहे.

---*---

**ठराव :-**

अहमदनगर शहर वाहतूक आराखडा तयार करणे या प्रस्तावास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच ऑफिस रिपोर्ट प्रमाणे या अंतर्गत बस वाहतुक प्रकल्प अहवाल मा.केंद्र शासनाच्या सलग्न असणारी संस्था मे.अर्बन मार्स ट्रान्सीस्ट कंपनी (UMTC) यांचेकडुन मा.शासनाच्या वित्तीय खर्चास मर्यादेत करणेसाठी व सदर प्रकल्प अहवाल मा.केंद्र शासनास JNNURM / UIDSSMT या योजनेअंतर्गत सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे,

अनुमोदक : मा.श्री.अशोक किसन बडे,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १९** **दिनांक : ११ / ०७ /२०१३.**

---

**प्रस्तावाचा विषय :** सिक्युरिटी डिपॉझिट रिफंड मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

१) मे.जगदंबा इले.मजुर सह संस्था मर्या, अहमदनगर यांचा दि.०४/०९/२०१२ रोजीचा अर्ज.

२) मा.आयुक्त यांची दिनांक ०८/०२/२०१३ रोजीची मंजुरी.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ- चे.जगदंबा इले.मजुर सह संस्था मर्या., अहमदनगर व चे.सातीसाकळाई म.स.सं.मर्या., अहमदनगर यांचा दिनांक ०४/०९/२०१२ रोजीचा अर्ज.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, चे.जगदंबा इले.मजुर सह संस्था मर्या., अहमदनगर यांनी इकडेस पत्र देवुन प्रभाग क्र.१ मध्ये अष्टविनायक कॉलनी अंतर्गत ३०० एमएम बंद पाईप गटर करणे या कामाची अनामत रक्कम परत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. सदर ठेकेदाराने महानगरपालिकेकडे पा.नं.०४८८९४ दिनांक १४/०३/२००८ अन्वये रक्कम रु.१६७५०/- इतकी व ८५००/- इतकी रक्कम बीलातुन कपात करण्यात आलेली आहे. सदरची पावती होवुन तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. इतर सिक्युरीटी डिपॉझीट रजिष्टरला पाहिले असता सदर रक्कम ही फॉरबीड झालेली असल्याचे निदर्शनास आले. सदरचे काम हे अनुक्रमे दिनांक १५/०६/२००८ रोजी पुर्ण झालेले आहे. सदर डिपॉझीटला तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१९०(३) अन्वये ३ वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी केलेल्या सर्व शिलकी प्रत्येक वर्ष अखेर महानगरपालिकेकडे व्यपगत होतात.

तरी सदर ठेकेदार यांनी सिक्युरीटी डिपॉझीट पोटी महानगरपालिकेकडे कार्यारंभ करतेवेळी पावतीने जमा केलेली व बिलातुन कपात केलेली सिक्युरीडी डिपॉझिट परत देणे बाबत प्रस्ताव मा.महासभेसमोर निर्णयास्तव पाठविणेस आदेशार्थ सविनय सादर.

यावर उपशहर अभियंता यांचा अभिप्राय की, उपरोक्त कामासाठीची सुरक्षा अनामत भरलेपासून जाने २०१३ अखेर ३ वर्षे झाली आहेत. सदर सुरक्षा अनामत रक्कम मनपा फंडात जमा झाली असलेने सदरची रक्कम अर्जदासरास परत करावयाची झाल्यास मा.महासभेची मंजूरी आवश्यक आहे. सबब मा.महासभेपुढे सादर करणेस मान्यतेस सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, अ मध्ये नमुद केलेले आहे त्याप्रमाणे Forbeit व्यपगत झालेली रक्कम रु.२५२५०/- डिपॉझीट परत देणे बाबत प्रस्ताव मा.महासभेसमोर निर्णयास्तव सादर करण्यास हरकत नसावी.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, सदरचा विषय मा.महासभेपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्य.

अशा बाबतचा ऑफिस प्रस्ताव मा.आयुक्त साहेब, उपायुक्त (सा), मुख्यलेखाधिकारी, मुख्यलेखापरीक्षक, शहरअभियंता, उपशहरअभियंता यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

चर्चा :- नाही.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्टमध्ये नमुद केल्यानुसार संबंधीत मजुर संस्थेची अनामत रक्कम रुपये १६,७५०/- व बीलामधुन कपात केलेली रक्कम रु.८,५००/- अशी एकुण रक्कम रुपये २५,२५०/- परत करण्यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे,

अनुमोदक : मा.श्री.अशोक किसन बडे,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २०** **दिनांक : ११ / ०७ /२०१३.**

---

**प्रस्तावाचा विषय :** भिंगार सर्व्हे नं.३४३/२अ/२ब, ३४३/२अ२, ३४३ २अ-१,३४३/१ब मधील मोकळी जागा एकता एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी या संस्थेस प्ले ग्रुप व क्रीडांगणासाठी देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- सचिव एकता एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी अहमदनगर यांचा दिनांक १५/०५/२०१२ चा अर्ज.

अर्जदार सचिव एकता एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी अहमदनगर यांनी दिनांक १५/०५/२०१२ रोजी इकडेस अर्ज सादर करुन सर्व्हे नंबर ३४३/२अ/२ब/३४३/२अ२,३४३/२अ१,३४३/१ब या मंजूर रेखांकनातील खुली जागा प्ले ग्रुप व क्रिडांगणासाठी मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

वरील संस्थेने मागणी केलेल्या भिंगार येथील सर्व्हे नंबर ३४३/२अ/२ब/३४३/२अ२,३४३/ २अ१, ३४३/१ब या जागेचे मालक अहमदनगर महानगरपालिका हे असून या रेखांकनामध्ये एकुण ४८ भुखंड हे प्रस्तावित केलेले असून या खुल्या जागेचे क्षेत्र २८८०.०६ चौ.मी.इतके आहे.

सदर संस्था ही नोंदणीकृत असुन या संस्थेमार्फत शैक्षणिक व सामाजिक कार्य केले जातात. तसेच गरीब मुलांसाठी प्ले ग्रुप विनामुल्य चालविले जात असून त्यांना शिक्षण, खेळ आणि पुरक आहार इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

तथापि भविष्यात प्रस्तृत खुल्या जागेत अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या दृष्टीने सदरची खुली जागा वरील संस्थेस वार्षिक भाडे रुपये १०००/- (एक हजार रुपये फक्त) घेवुन शैक्षणिक कार्य चालू असे पर्यंत देणे झाल्यास खालील अटी व शर्ती टाकणे उचित होईल.

१) सदर खुली जागा ही खुली ठेवावी. त्यामध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

२) सदर खुली जागा ही सदर रेखांकनामधील सर्व भुखंड धारकांना कायम वापरता येईल अशा प्रकारे विकसीत करावी. भुखंड धारकांना कोणत्याही प्रकारे वापरासाठी निर्बंध घालता येणार नाही.

३) खुल्या जागेच्या विकासासाठीचा संपूर्ण खर्च आपल्या संस्थेस करावा लागेल. सदरचा खर्च केंव्हाही महानगरपालिकेकडे मागता येणार नाही.

४) वरील अटी मान्य असल्या बाबत रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत संमत्तीपत्र करुन द्यावे लागेल.

तरी एकता एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी या संस्थेस प्ले ग्रुप व क्रींडांगणासाठी भिंगार सर्व्हे नंबर ३४३/२अ/२ब,३४३/२अ२,३४३/२अ१,३४३/१ब मधील खुली जागा वरील अटीस अधीन राहून देणे बाबतचा प्रस्ताव महासभेपुढे घेणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित प्रमाणे सदरील विषय मा.महासभेपुढे मान्यतेस्तव ठेवण्यासाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रशासन अधिकारी यांचे सह समक्ष भेट देवुन अहवाल सादर करावा.

यावर प्रशासनाधिकारी, मनपा शिक्षण मंडळ यांचा मा.आयुक्त सो यांना अभिप्राय की, दिनांक २७/०८/२०१२ रोजी भिंगार सर्व्हे नंबर ३४३/२अ/२ब,३४३/२अ२,३४३/२अ-१,३४३/१ब या रेखांकनातील मोकळ्या जागेस समक्ष भेट दिली या मंजूर रेखांकनातील खुली जागा एकता एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी, अहमदनगर या नोंदणीकृत संस्थेस शैक्षणिक कार्य प्ले ग्रुप व क्रीडांगणासाठी देण्यास हरकत नाही.

यावर मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय की, प्रशासनाधिकारी यांचेसह जागेस समक्ष भेट दिली. यापुर्वी टिप्पणी पान क्र.१ वर या विभागाने जागा मंजूरीची शिफारस केलेली आहे. सदरील विषय मा.महासभेपुढे ठेवणेसाठी मंजूरीस्तव फेरसादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, समक्ष बोला.

यावर नगररचनाकार यांचेकडुन फेरसादर की, घटनेची प्रत प्राप्त केली आहे. शैक्षणिक कार्य, क्रीडा सारखे उद्दीष्ट त्यांचे आहेत. त्यामुळे खुली जागा मंजूरीसाठी फेरसादर.

यावर मा.आयुक्त सो यांचा अभिप्राय की, नमूद अहवाल व संबंधीत कागदपत्रे यांचे अवलोकन केले त्यानुसार मे.महासभेचे मान्यतेस सादर करणेस मंजूरी देणेत येते.

अशा बाबतचा ऑफिस प्रस्ताव मा.आयुक्त साहेब, नगररचनाकार, मनपा प्रशासनाधिकारी, यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-** नाही.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट नुसार भिंगार सर्व्हे नं.३४३/२अ/२ब, ३४३/२अ२, ३४३ २अ-१,३४३/१ब मधील मोकळी जागा एकता एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी या संस्थेस प्ले ग्रुप व क्रीडांगणासाठी जागा भाडे पट्टयाने कराराने देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.अशोक किसन बडे,

अनुमोदक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.